नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २७/१०/२०२६ (मंगळवार)

खुनाच्या गुन्हयातील आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली आजीवन कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन कुही :— फिर्यादी अंकित तुळशीराम बिसेन, वय २० वर्षे, रा. केशव नगरी, धामना, ता. जि. नागपूर यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कुही येथे अप. क्र. १३/२०२५ कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्ह्याची थोडक्यात हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे नात्याने सख्खे भाऊ लागत असून यातील फिर्यादी यांचे वडील/मृतक तुळशीराम माणिकलाल बिसेन, वय ५५ वर्षे हे दारू पिण्याचे सवयीचे असून त्यांच्यासोबत आरोपी नामे जितेंद्र तुळशीराम बिसेन, वय २२ वर्षे, रा. केशव नगरी, धामना, ता. जि. नागपूर यांचे नेहमी भांडण होत असते.दिनांक १२/०१/२०२५ रोजी यातील मृतक हे दारू पिऊन घरी आले असताना आरोपीने त्यांच्यासोबत भांडण करून त्यांना लाथाबुक्क्याने मारहाण करून, त्यांना बांबूचे काठीने डोक्यावर मारहाण करून आरोपी यांनी जिवानिशी ठार मारले .

तपासी अधिकारी श्री हरिशचंद्र इंगोले, सहा पोलीस निरीक्षक, कुही यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक २७/१०/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्र.३ श्री आर. एम. मिश्रा यांनी नमुद आरोपी जितेंद्र तुळशीराम बिसेन यास कलम १०३(१) भान्यासं मध्ये आजीवन कारावास व २०००/—रू दंड, दंड न भरल्यास ६ महीने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती व्हि. जे. सायखेडकर यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री मयंक माधव, सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील,प्रभारी अधिकारी,पोलीस

स्टेशन कुही , पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सहा. पोलीस निरीक्षक श्री विशांत नांदगाये, पोहवा श्री गणेश भुरे, ब.नं १५८२, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण तसेच सहा फौजदार संतोष गुंटीवार,ब.नं २२६ ,पैरवी अधिकारी, कुही पोलीस स्टेशन यांनी महत्वपुर्ण योगदान दिले.

मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्यासाठी घेतली " सर्व कर्मचारी संवाद बैठक"

(All Hands Meet)

आज दिनांक २७/१०/२०२६ रोजी पोलीस भवन, नागपुर येथे मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, तसेच पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा येथील पोलीस अधिकारी, अंमलदार आणि मंत्रालयीन स्टाफ यांची **" सर्व कर्मचारी संवाद बैठक " (All Hands Meet) घेतली.** उपस्थित पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या अडीअडचणी, कामकाजासंदर्भातील विविध मुद्दे तसेच नवनविन कल्पना या विषयांवर चर्चा करण्यात आली.

सदर बैठकीदरम्यान विविध शाखांच्या कामकाजाचा आढावा घेताना कामकाज अधिक गतिमान व कार्यक्षम करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत आदेश देण्यात आले. तसेच मागील बैठकीत मांडण्यात आलेल्या अडचणींबाबत मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांनी संबंधितांकडून माहिती घेऊन, सदर अडचणींचे निराकरण झाले आहे किंवा कसे, याबाबत आढावा घेतला. यावेळी मागील बैठकीत मांडण्यात आलेल्या सर्व अडचणींचे निराकरण करण्यात आले असून, संबंधित मागण्यांचीही पूर्तता झाल्याचे निदर्शनास आले.

मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांनी अधिकारी व अंमलदारांच्या सूचना गांभीर्याने ऐकून घेत, पोलिस दलाच्या दैनंदिन कामकाजातील अडचणी दूर करून उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर, कार्यक्षमता वाढविण्याबाबत मार्गदर्शन केले.

सदर बैठकीत पोलीस दलातील विविध पदावरील अधिकारी/अंमलदार यांच्या अनुभवाचा उपयोग करून पोलीस दलातील कामकाजात येणाऱ्या अडचणींवर उपाय शोधणे, पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविणे, शिस्त व समन्वय राखणे याबाबत चर्चा करण्यात आली. **सदर सर्व कर्मचारी संवाद बैठकीस श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण**

जिल्हा, श्रीमती पुजा गायकवाड,पोलीस उपअधिक्षक (गृह),तसेच सर्व शाखेचे प्रभारी अधिकारी, अंमलदार आणि पोलीस मुख्यालय येथील अधिकारी आणि अंमलदार उपस्थित होते.







अवैधरीत्या गांजाची लागवड करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, १ आरोपी अटक
नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांच्या यांच्या नेतृत्वात सहा पोलीस निरीक्षक श्री पुरूषोत्तम मोहेकर, पोउपनि श्री प्रविण भिमटे आणि पथक यांनी दिनांक २६/१०/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीत गंगाजी डोरली शेत शिवरात अवैधरीत्या गांजाची लागवड करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई करून ४०,२१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

दिनांक २६/१०/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक हे कळमेश्वर परिसरात पेट्रोलिंग करत असताना त्यांना खात्रीशिर गोपनीय माहिती मिळाली की, **कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीत गंगाजी डोरली येथे आरोपी क्र. १ नितेश सखलेजा, रा. नागपूर यांच्या शेतात असलेल्या फार्महाऊसवर केअरटेकर म्हणून काम करणारा आरोपी क्र. २ बबलू बुद्ध शाहू ,वय ४० वर्ष, रा.वार्ड क्र. ३ चणकापूर ,खापरखेडा, ता.सावनेर, जि. नागपूर ,ह.मु. नितेश सखलेजा यांच्या शेतात याने सदर शेतामध्ये गांजाच्या झाडांची लागवड** केलेली आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे अंमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई करत सदर घटनास्थळी धाड टाकली असता नमुद ठिकाणी ०९ गांजाची झाडे मिळून आले.

पोलीसांनी पंचासमक्ष एकुण ०९ अंमली पदार्थ गांजाची झाडे वजन १.३५८ ग्रॅम किंमती २७१२०/— रूपये , एक चिलम आणि एक मोबाईल असा एकुण ४०,२१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द कलम ८(सी), २०(ए) एनडीपीएस कायदयान्वये गुन्हा नोदं करून आरोपी क्रं २ याला अटक करण्यात आली आहे.

रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, पारशिवणी पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन पारशिवणी :— दिनांक २६/१०/२०२६ रोजी पारशिवणी पोलीस अवैध धंदयांवर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **ट्रॅक्टरने अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे.** मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी ट्रॅक्टर शोध कामी सर्तक पेट्रोलींग केली असता मौजा बाबूळवाडा येथे एक संशयीत ट्रॅक्टर ट्रॉली सह दिसुन आला. सदर ट्रॅक्टर चालकास पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव **आरोपी क्र १) संदिप यशवंतराव भागडकर, रा. बाबूळवाळा ता. पारशिवनी,** अशी माहीती दिली. पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातील महीन्द्रा कपंनीचा टॅक्टर क्र एम एच —४०—सी एच—७७९५ त्याला जोडलेली विनाक्रमांकाची ट्रॉली ची तपासणी केली रेती आढळुन आली. तसेच रेतीची साठवणुक केल्याची सुध्दा माहीती मिळाली. पोलीसांनी त्याला अधिक विचारपुस केली असता त्याने **आरोपी क्र २) वाहन मालक बालू सोनटक्के रा. पारशिवनी ,या**च्या सांगण्यावरून पेंच नदी पात्रातुन अवैधरित्या उत्खनन करून रेतीची चोरटी वाहतुक केल्याचे सांगितले

पोलीसांनी पंचासमक्ष ट्रॅक्टर ट्रॉली किंमती ५,००,०००/—रूपये , वाहनातील १ ब्रास रेती किंमती ५,०००/— रूपये आणि स्वताचे घराजवळील हनूमान मंदीराजवळ अवैध्यरित्या रेतीचा साठा ०२ ब्रास रेती किंमती १०,०००/— रूपये असा एकुण किंमती ५,१५,००० /—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे पारशिवणी येथे कलम ३०३(२), ४९ भान्यासं सहकलम ४८(७)(८)महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, सहकलम ४/२१ खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे .

पेंच—कन्हान नदीपात्रालगतच्या शेतशिवारात पोलीस व महसूल विभागाच्या संयुक्त पथकाकडून प्रत्यक्ष पाहणी

रेती चोरीला आळा घालण्यासाठी दिनांक २७/१०/२०२६ रोजी पोलीस व महसूल विभागाच्या संयुक्त पथकाद्वारे ग्राम गरंडा परिसरात प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. यावेळी नायब तहसीलदार, पारशिवणी आणि प्रभारी अधिकारी ,पोलीस स्टेशन पारशिवणी हे प्रत्यक्ष उपस्थित होते

प्रत्यक्ष पाहणीदरम्यान पेंच नदीलगत ०६ एकर शेत असल्याचे निदर्शनास आले. सदर शेतातील पाण्याच्या नहरालगत मातीचा रस्ता तयार करण्यात आला असून, हा रस्ता थेट पेच नदीपात्रात मिळत असल्याचे आढळून आले. या रस्त्याबाबत दिनांक ०९/१०/२०२६ रोजी माहीती मिळाल्यानंतर महसूल प्रशासनाने त्याच दिवशी तात्काळ जेसीबीच्या साहाय्याने सदर रस्त्यावर दोन मोठे खड्डे खोदून रस्ता बंद केला होता. पाहणीच्या वेळी सदर खड्डे कायम असल्याचे आढळून आले. तसेच संबंधित ठिकाणी नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह सुरळीत सुरू असून, पाण्याचा प्रवाह वळविण्यात आल्याचे आढळून आले नाही. नदीच्या प्रवाहाच्या पलीकडील बाजूस रेती असल्याचे दिसून आले. तथापि, प्रत्यक्ष पाहणीदरम्यान सदर ठिकाणी रेतीचे अवैध उत्खनन झाल्याचे निदर्शनास आले नाही. शेतमालकाने शेतातील मातीचे उत्खनन करून तिचा वापर शेतातील रस्त्याच्या निर्मितीसाठी केल्याचे आढळून आले.

शेतातील माती उत्खनन प्रकरणी महसूल विभागामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.



वडोदा पोलीस स्टेशन हद्दीत मिळुन आलेल्या सुपारीची वाहने पुढील कार्यवाही कामी साठा अन्न व औषध प्रशासन विभागाकडे सुपुर्द

दिनांक २४/१०/२०२६ रोजी डायल ११२ वर वडोदा पोलीसांना माहीती प्राप्त झाली की, अवैधरित्या विनापरवाना निकृष्ट दार्जाच्या सुपारीची वाहतूक केली आहे. सदर ०४ वाहने महालगाव — लिहगाव रोड लगत असलेल्या गोदामाजवळ थांबलेली आहे. सदर माहीती प्राप्त होताच पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी पोहचुन वाहनांची पंचासमक्ष तपसणी केली. तसेच वाहनात असलेल्या सुपारी बाबत विचारणा केली. तसेच ४ वाहनांना ताब्यात घेतले सदर सुपारी ही निकृष्ट दर्जाची असल्याबाबत तक्रारदार यांची तक्रार असल्याने तात्काळ अन्न व औषध प्रशासन विभागाला पाचारण करण्यात आले.

वडोदा पोलीसांकडुन पुढील तपासणी व आवश्यक कार्यवाही करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाला पत्राद्वारे कळविण्यात आले तसेच वाहनांचा ताबा देण्यात आला. त्यानुसार अन्न व औषध प्रशासन विभागाने गोदामाची तपासणी केली. एकूण ७३,६३४ किलो

सुपारीचा माल अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत जप्त करून जागेवरच सील करण्यात आला. सदर प्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत पुढील चौकशी व नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

नरखेड येथील पेट्रोल पंपानजीकच्या रस्त्यावर स्पीड ब्रेकर व सूचना फलक अस्तित्वात

दिनांक २६/१०/२०२६ रोजी एका वृत्तपत्रात "हादसे रोकने स्पीड ब्रेकर बेहद जरूरी" या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेल्या बातमीमध्ये नरखेड शहराजवळील नरखेड ते सावरगाव रोडवरील पेट्रोल पंपानजीकच्या रस्त्यावर स्पीड ब्रेकर नसल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.

सदर बातमीच्या अनुषंगाने वस्तुस्थिती अशी आहे की, संबंधित रस्त्यावर स्पीड ब्रेकर अस्तित्वात असून, सदर ठिकाणी मागील २ वर्षांत कोणत्याही अपघाताची नोंद झालेली नाही. तसेच, संबंधित रस्त्यावर वाहनचालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक दिशादर्शक व सूचनात्मक फलक लावण्यात आलेले आहेत.

नागरिकांनी तसेच वाहनचालकांनी वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, वेगमर्यादेचे उल्लंघन करू नये आणि रस्त्यावरील सूचनात्मक फलकांचे पालन करून सुरक्षित वाहनचालना करावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलिसांतर्फे करण्यात येत आहे.



अवैध जुगार सट्टापट्टी चालवणाऱ्यावर गुन्हा नोंद ,
स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

दिनांक २६/१०/२०२६ स्थानक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्तबामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, बोरी टाउन येथे अवैधरित्या जुगार खेळला जात आहे. नमुद पोलीस पथकाने तात्काळ कारवाई करत घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी नामे १. आतिशोत ज्ञानेष्वर शेंडे,वय ३४ वर्ष, २. राजेश उर्फ दादा सिताराम ,वय ४२ वर्ष, दोन्ही रा. बूटटीबोरी, ता. जि. नागपूर हे सट्टापट्टीचा जुगार खेळतांना व खेळवितांना मिळुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन २ ॲडड्रॅईड मोबाईल, एकुण रोख रक्कम १४५०/—रुपये, इतर साहीत्य असा एकुण १३६३४/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. नमुद प्रकरणी वरील आरोपी यांच्या विरुद्ध कलम १२ अ म.जू.का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर १८ गुन्हे दाखल,

दिनांक २६/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण १८ गुन्हे दाखल केले.

पोलीस स्टेशन सावनेर येथे १) देवानंद गणेश नेवारे,वय २४ वर्ष,रा सावनेर बस स्टॉपचे समोर पाउनचार हॉटेल मागे ता. सावनेर आणि २) कैलास नंनदुजी आबुडारे वय ३० वर्ष,रा. रेल्वे स्टेशन सावनेर मागे ता. सावनेर,जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे क्रं १) विजय चंद्रभान खंडाते ,वय ३६ वर्ष ,रा.कोरमेटा ता. सावनेर,जि. नागपूर आणि ,२) महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे १) प्रकाश शालीकराम भलावी वय ४५ वर्ष,रा शिगोरी ता मौदा, जि नागपूर, २) रतीक धनराज डेंगे, वय २६ वर्ष ,रा. प्लॉट नं ७७ भोलेबाबा नगर जानकी नगर नागपूर आणि ३) विवेक उर्फ विक्की प्रेमदास मेश्राम,वय ४० वर्ष,रा. धानला ता—मौदा यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद आहे, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे १) केशव बारसु दिघोरे,वय ६० वर्ष,रा बुधवारीपेठ उमरेड,२) शिंवशकर राजेराम समर्थ वय ५२ वर्ष,रा.नाळ, आणि ३) महीला आरोपी,यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद.**पोलीस स्टेशन कुही** येथे विशाल उर्फ टेकचंद नत्थुलाल जैस्वाल,वय ६५ वर्ष,रा तितुर ता कुही याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन काटोल** येथे जयशिल ईश्वर खंडाईत वय ४५ वर्ष रा पारडसिंगा **याचेवर** ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन बोरी** येथे १) राजू मोतिराम झाकनकर वय ४० वर्ष रा. रूईखैरी ता जि नागपूर,२) जगदिश धरम बावरी,वय ४० वर्ष, रा.रूईखैरी ता जि नागपूर,३) नवसू गोपाळा महाजन, वय ३२ वर्ष,रा. ढवळपेठ ता जि नागपूर, आणि ४) किशोर प्रमोद गेडाम,वय ३० वर्ष, रा कतरी जि यवतमाळ, ह.मू दूधा ता जि नागपूर यांचेवर

प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०४ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन एम आय डी सी बोरी** येथे १) दत्तु महादेव प्रगट,वय ४९ वर्ष,रा प्लाट नं ७ राम मंदीरजवळ अयोध्या नगर नागपुर ह.मु वटेघाट आणि २) आकाश राजकुमार तेलंग वय ३५ वर्ष,रा वरोरा ता वरोरा,जि चंद्रपुर हमु भारकस,ता हिंगणा जि नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद आहे.

नमुद कारवाईत एकुण १२४७० मिली देशी दारू, २६ लीटर मोहाफुल दारू,असा एकुण ८३२०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६७५ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २७/१०/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ६७५ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

नागपुर उपविभाग :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे २९ आरोपी अशा एकुण ९० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

उमरेड उपविभाग :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४३ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे १९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी, पोलीस स्टेशन पाचगाव १० आरोपी अशा एकुण १२२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

सावनेर उपविभाग :— सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३७ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १६ आरोपी

पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन मोहपा १५ आरोपी अशा एकुण १३८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

कन्हान उपविभाग :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे १८ आरोपी आणि पोलीस स्टेशन वडोदा येथे १८ आरोपी अशा एकुण ७१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

रामटेक उपविभाग :— रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २५ आरोपी अशा एकुण ११४रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

काटोल उपविभाग :— काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४२ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २७ आरोपी अशा एकुण १४० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.







जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर